# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १४०/२०११-१२ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. बळीराम विठू शिंदे,<br>मु. सौते, पोष्ट शिंपे, ता. शाहूवाडी, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, कोल्हापूर | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण विभागीय कार्यालय क्र. १, कोल्हापूर | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, शाहूवाडी, जि. कोल्हापूर | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बळी विठू शिंदे मु. सौते, पोष्ट शिंपे, ता. शाहूवाडी, जि. सांगली यांनी वितरण कंपनीच्या ग्रामीण विभाग १, कोल्हापूर यांच्याविरुध्द १६.११.२०११ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांचेकडे गाऱ्हाणे दाखल केले. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार हे वि.प.चे ग्राहक आहेत. त्यांचा ग्राहक क्र. २६०४८०००३४७२ आहे. त्यांनी गट क्र. १०५ सौते येथे विहीरीवर ३ एचपीची मोटर बसविली आहे. श्री. मधुकर तुकाराम शिंदे यांनी घेतलेल्या हरकतीमुळे या मंचाच्या आदेशानुसार त्यांच्या वीज जोडणी विद्युत पुरवठा खंडित केला आहे. ग्राहकाचे भाऊ श्री. बापू विठू शिंदे यांचे ७/१२ नुसार ६०% क्षेत्र आहे. श्री. मधुकर तुकाराम शिंदे व त्यांचे भाऊ यांनी संमत्ती दिली नाही. श्री. मधुकर शिंदे हे स्वत: नोकरी निमित्त बाहेरगांवी असतात व चंद्राप्पा शिंदे हे मयत आहेत. तसेच श्री. सदाशिव शिंदे यांची विहीरीवर ५ एचपीची मोटर आहे. विहीरीवर समाईक क्षेत्र असून वाटप झाले नाही. वीज जोडणी पूर्ववत करुन मिळावी, तसे आदेश वि.प.ला द्यावेत अशी मागणी केली आहे.

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडून दि. ४.१०.२०११ रोजी ग्राहकाचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. त्याच्या नाराजीने प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दाखल केले आहे. वि.प.ने आपला दि. २७.१२.२०११ चा लेखी अहवाल मंचासमोर सुनावणीचेवेळी दाखल केला. प्रस्तुत प्रकरणाचे सुनावणीवेळी ग्राहक प्रतिनिधी श्री. बाबासो बळीराम शिंदे उपस्थित. तसेच पुतणे श्री. रामचंद्र बापू शिंदे उपस्थित. त्यांनी मंचाला अधिकारपत्र आणून देण्याची हमी दिल्यानंतर त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. एस.एस. रानभरे, उप कार्यकारी अभियंता बी.एस.गोरे व सहाय्यक अभियंता, शाहूवाडी श्री. सुयोग पाटणकर उपस्थित. ग्राहक प्रतिनिधी श्री. रामचंद्र बापू शिंदे यांनी सह-हिस्सेदार यांनी विद्युत कनेक्शनसाठी संमत्ती देण्याचे कबूल केले होते, परंतु संमत्ती दिली नाही. त्यामुळे वि.प.ने मंचाच्या आदेशानुसार सह-हिस्सेदारांची संमत्ती नसल्यामुळे जोडणीचा वीज पुरवठा खंडित केला आहे.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाची वीज जोडणी पूर्ववत व्हावी ही मागणी मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

तक्रार फेटाळण्यात येत आहे.

<u>कारणमिमांसा</u>

श्री. मधुकर तुकाराम शिंदे यांनी दि. ३१.१.२०११ रोजी मंचासमोर तक्रार क्र. ४०७/१०-११ दाखल करुन प्रस्तुत तक्रारदार यांना दिलेली वीज जोडणी खंडित करण्यात यावी म्हणून दाखल केली, कारण त्यासाठी त्यांची संमत्ती नव्हती. त्यामुळे मंचाने वितरण कंपनी, कनिष्ठ अभियंता, शाखा सरुड, ता. शाहूवाडी यांनी श्री. बळी विठू शिंदे यांच्या वीज जोडणीसाठी लागणारे आवश्यक ते संमत्तीपत्र हा आदेश प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यात पूर्तता करुन घ्यावी अन्यथा श्री. बळी विठू शिंदे यांचा वीज पुरवठा खंडीत करावा असे आदेश दिले होते.

श्री. मधुकर तुकाराम शिंदे यांनी भरपाईची रक्कम रु. ७५००/- नामंजूर केल्याच्या नाराजीने मा. विद्युत लोकपाल यांच्याकडे तक्रार दाखल केली होती ती दि. १६.७.२०११ ला मा. लोकपाल यांनी फेटाळली. श्री.मधुकर तु. शिंदे यांनी मा. लोकपाल यांचेकडे पुनर्विलोकनासाठी अर्ज ९८/२०११ दाखल केला, तो मा. लोकपाल यांनी दि. ३०.९.२०११ रोजी फेटाळले. ग्राहकाचे प्रतिनिधी श्री. रामचंद्र बापू शिंदे यांना प्रस्तुत तक्रारदार यांनी या आदेशाविरुध्द कांही कायदेशीर कारवाई, रिट पिटीशन, दावा वगैरे दाखल केला आहे का ? अशी विचारणा केली असतां, त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

या मंचाने वितरण कंपनीचे दि. ४.१०.२००५ च्या सर्क्यूलर प्रमाणे एका पेक्षा जास्त मालक असतांना त्यांचे ना हरकत पत्र रु. १००/- चे स्टँपवर घेतले नसल्याचे स्पष्ट झाल्याने मंचाच्या आदेशानंतर ३ महिन्यात संमत्तीपत्र श्री. बळी विठू शिंदे यांनी न दिल्यास वीज पुरवठा खंडित करावा असे आदेश दिले. त्या आदेशानुसार श्री. बळी विठू शिंदे यांचा वीज पुरवठा खंडित झाला आहे.

प्रस्तुत तक्रारीमध्ये तक्रारदार यांनी परत पूर्वीप्रमाणे विद्युत पुरवठा सुरु करावा, हरकतदार संमत्ती पत्र देत नाही कारण त्यांचे क्षेत्र कमी आहे, तक्रारदार व त्यांचे भाऊ यांचे क्षेत्र ६०% आहे, विहीरीची जागा समाईक आहे, बागाईत पिकाचे नुकसान होत आहे अशा अडचणी सांगितल्या. परंतु या तक्रारीनुसार परत जोडणीचा विद्युत पुरवठा सुरु करण्याची मागणी करुन ग्राहक या मंचाचे आदेश रद्द करण्याची मागणी करीत आहे, ती कायद्याने मंजूर करता येणार नाही, कारण ज्या कारणावरुन वीज पुरवठा खंडित झाला त्या हरकतदाराचे संमत्तीपत्र घेण्यासाठी ३ महिन्याची मुदत दिली होती. ती हरकत दूर झाल्याशिवाय वीज जोडणीचे आदेश देता येणार नााहीत. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using SmartPDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using
Smart PDF Creator
To remove this message purchase the
product at www.SmartPDFCreator.com

This document was created using
Smart PDF Creator
To remove this message purchase the
product at www.SmartPDFCreator.com